# महाराष्ट्र शासन

क्रमांक : टिईएम-२०१९/प्र.क्र.१८२/तांशि-४,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
खो.क्र.४४१, चौथा मजला,
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४०९३५
दिनांक : २७ जून, २०१९

प्रति,

आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला,
न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक
मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

विषय :- तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत वाढ देणेबाबत.

संदर्भ :- समक्रमांकाचे दिनांक २६/६/२०१९ चे शासन पत्र.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाचे खालीलप्रमाणे निदेश आहेत :-

"तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते त्या प्रवेश प्रक्रियेकरीता मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशाचा अर्ज भरताना जात वैधता प्रमाणपत्राची सक्ती करण्यात येऊ नये. ज्या विद्यार्थ्याने संबंधित जात पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे, अशा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यास व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची दुसरी फेरी सुरु होण्यापूर्वी प्रवेश नियामक प्राधिकरण निश्चित करेल अशा योग्य दिनांकापर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत देण्यात यावी."

२. यावाबत पुढीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करण्याची विनंती आहे.

आपला,

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner